राज्य आयोग, महाराष्ट्र, मुंबई
आवक क्र. 678
दिनांक: 29/01/2016
आवक लिपिक स्वाक्षरी
प्रबंधक स्वाक्षरी

राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या आस्थापनेवरील गट अ व गट-ब (राजपत्रित) या पदावरील पदोन्नतीसाठी राज्यस्तरीय निवड समिती गठीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
शासन निर्णय क्र.ग्रासंक-२०१५/८२२/प्र.क्र.१५९/ ग्रासं. ४
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय,मुंबई ४०० ०३४
दिनांक:- २८जानेवारी, २०१६

वाचा : १. शा.नि.अ.ना.पु व ग्रा.सं. क्र.ग्रासंक-२२१०/प्र.क्र.२६६/ग्रासं-३, दि.१६.११.२०१३
२. शा.अधि.अ.ना.पु. व ग्रा.सं. क्र.ग्रासंनि-२०१४/१२४/प्र.क्र.२८/ग्रासं-४, दि.१.१.२०१५
३. रा.ग्रा.त.नि.आ., मुंबई यांचे पत्र क्र.राआ/आस्था/कक्ष-१/ससे/पदो.समिती/२०१५/६५७३, दि.५.१०.२०१५

शासन निर्णय :

वैधमापन शास्त्र विभाग व ग्राहक संरक्षण यंत्रणा या दोन्ही यंत्रणेतील संवर्ग व्यवस्थापनेमध्ये कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक बाबींच्या अनुषंगाने प्रशासकीय अडचणी विचारात घेऊन दि.१६.११.२०१३ च्या शासन निर्णयान्वये स्वतंत्र संवर्ग स्थापन करण्यात आले. त्या अनुषंगाने दि.१.१.२०१५ च्या अधिसूचनेन्वये प्रबंधक(विधी), गट-अ (राजपत्रित), प्रबंधक (प्रशासन), गट-अ(राजपत्रित) व लेखाधिकारी, गट-ब(राजपत्रित) तसेच जिल्हा ग्राहक मंच या कार्यालयातील प्रबंधक गट-ब (राजपत्रित) या पदांचे सेवाप्रवेश नियम तयार करण्यात आले त्या अनुषंगाने अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या आस्थापनेवरील गट-अ व गट-ब (राजपत्रित) या संवर्गातील पदावर पदोन्नती देण्याकरिता पुढीलप्रमाणे राज्यस्तरीय समिती गठीत करण्यात येत आहे.

१ गट-अ (राजपत्रित) पदावर पदोन्नतीसाठी राज्यस्तरीय निवड समिती

| धारण केलेले पद | पदोन्नतीचे पद | निवड समिती |
|---|---|---|
| १. प्रबंधक (प्रशासन)गट-अ | प्रबंधक (विधी) गट-अ | १.अमुस/प्रस/सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग- अध्यक्ष<br>२.अध्यक्ष,राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र मुंबई किंवा त्यांनी निर्देशित केलेले आयोगाचे सदस्य- सदस्य<br>३. मागासवर्गीय प्रतिनिधी, (गट-अ दर्जाचे) सदस्य<br>४. सहसचिव/उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग- सदस्य सचिव |
| १. प्रबंधक (गट-ब) | प्रबंधक (प्रशासन) गट-अ | |

२ गट-ब (राजपत्रित) पदावर पदोन्नतीसाठी राज्यस्तरीय निवड समिती

| धारण केलेले पद | पदोन्नतीचे पद | निवड समिती |
|---|---|---|
| अधीक्षक, जनसंपर्क अधिकारी, शिरस्तेदार | प्रबंधक, गट-ब (राजपत्रित) | १. अध्यक्ष, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र मुंबई- अध्यक्ष<br>२. सहसचिव/उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग- सदस्य<br>३. मागासवर्गीय प्रतिनिधी, (राजपत्रित) सदस्य<br>४. प्रबंधक (प्रशासन)/(विधी), राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई- सदस्य सचिव |
| | | |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

२०।१।१६

(सुभाष लाखे)
सह सचिव,
महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.मंत्री (अ.ना.पु. व ग्रा.सं.) यांचे सचिव,
२) मा.राज्यमंत्री (अ.ना.पु. व ग्रा.सं.) यांचे खाजगी सचिव,
३) सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई,
४) सर्व सहसचिव/उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई,
५) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई,
६) अध्यक्ष,राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र मुंबई- )
प्रबंधक (विधी), राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई,
८) परिक्रमा खंडपीठ नागपूर/औरंगाबाद,
९) जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच (सर्व),
१०) निवडनस्ती/ ग्रासं ४